<u>नियमित फौजदारी खटला क्र.९८/२०२२</u>
<u>निशाणी क्र.१७</u>

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :– | बंटी किसन भिल, |
| वय | :– | ३८ वर्ष, |
| व्यवसाय | :– | मजुरी , |
| राहणार | :– | अक्कडसे, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

.......................................................................................................

<u>**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.**</u>

दि.२६.०४.२०२२ रोजी मी लतिश पवार यांच्या शेतात होतो. तेव्हा मला ऊसाच्या वावरातुन धुर येतांना दिसला. त्यामुळे मी आणि मालक आम्ही दोघांनी त्याठिकाणी जावुन पाहिले. त्यावेळी भिमराव पाटील याच्या हातात टेंभा होता. भिमराव पाटील आम्हाला पाहुन तेथुन पळून गेला. त्यानंतर मी आणि मालक आम्ही सोनेवाडी गावात गेलो होतो. माझ्या मालकाने तेथे आरोपीकडुन नुकसान भरपाईची मागणी केली. त्यावेळी आरोपीने भरपाई देणार असे सांगितले. त्यानंतर पुढे काय झाले ते मला माहित नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी आरोपीला बघितल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.बी.व्ही.सोनवणे यांचे मार्फत.**

हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी लतिशने सांगितल्याप्रमाणे आजरोजी न्यायालयात मी जबाब देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीकडे सालदार म्हणुन कामाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वावरात ऊस लावला होता ते वावर कोणत्या शिवारात आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या

शेतीचा गट नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकाच्या म्हणजेच फिर्यादीच्या फिर्यादीमध्ये जो मजकुर नमुद होता त्याप्रमाणे माझा जबाब नोंदवण्यात आला. फिर्यादीचे वडिल कधी मयत झाले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या जबाबात काय लिहिले आहे हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर की, "दि.२६.०४.२०२२ रोजी मी लतिश पवार यांच्या शेतात होतो. तेव्हा मला ऊसाच्या वावरातुन धुर येतांना दिसला. त्यामुळे मी आणि मालक आम्ही दोघांनी जावुन पाहिले. त्यावेळी भिमराव पाटील याच्या हातात टेंभा होता. भिमराव पाटील आम्हाला पाहुन तेथुन पळून गेला. त्यानंतर मी आणि मालक आम्ही सोनेवाडी गावात गेलो होतो. माझ्या मालकाने तेथे आरोपीकडुन नुकसान भरपाईची मागणी केली. त्यावेळी आरोपीने भरपाई देणार असे सांगितले. त्यानंतर पुढे काय झाले ते मला माहित नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.'' हा मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत व्हावी म्हणुन आजरोजी न्यायालयात मी साक्ष देण्यासाठी आलो आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/---
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०३/०४/२०२५

-: प्रमाणपत्र :-

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव :- सचिन अरुण परदेशी
न्यायालयाचे नाव :- सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,
शिंदखेडा, जि. धुळे.

आदेश अपलोड केलेचा दिनांक :- ०३/०४/२०२५

सही/---
लघुलेखक, श्रेणी-३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा